# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार**

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट १५/२०२५ दि. १०/०१/२०२५

## खुनाच्या गुन्हयात सुमारे ०१ वर्षापासुन फरार असलेल्या ०२ आरोपीतांना अटक करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

पेल्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. I ३७/२०२४ भा.द.वि.सं. कलम ३०२, ३६४, १४१, १४३, १४४, १४७, १४८, १४९, १२०(ब) मधील मयत सुधीर कुंजबिहारी सिंग, वय २७ वर्षे रा.हिन्दुस्थान नाका, कांदीवली पुर्व, मुंबई यास सदर गुन्हयातील १२ आरोपीत यांनी मिळुन रिक्षात जबरदस्तीने टाकुन पांडे नगर येथुन मारहाण करत गौराईपाडा नाका येथे घेऊन जाऊन मयत याच्यावर धारधार हत्याराने वार करुन जिवे ठार मारलेबाबत दिनांक १२/०१/२०२४ रोजी तक्रारदार श्री. वैभव रमेश मिश्रा, वय २८ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर यांनी दिलेल्या तक्रारी वरुन वरील प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयात एकुण ०७ आरोपीत यांना यापुर्वी अटक करण्यात आली असुन अद्यापपावेतो ०५ आरोपीत फरार आहेत. सदर गुन्हयातील फरार आरोपीत यांचा पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार गुप्त बातमीदार व तांत्रिक माहितीच्या आधारे सातत्याने शोध घेत आहेत.

आज रोजी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांना सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीत हे वसई तालुक्यात विरार पुर्व, भाटपाडा परिसरात येणार असल्याबाबत पो.अं. किरण आव्हाड यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली होती. गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी वरील मिळालेल्या माहितीच्या आधारे भाटपाडा, विरार पुर्व परिसरात सापळा रचुन सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीत १) रोहन विश्वनाथ सिंग, वय २८ वर्षे, रा. नेपुरा, ता. किराकत, जि.जोनपुर राज्य उत्तरप्रदेश, २) अखिलेश भोलानाथ यादव, वय २४ वर्षे, रा. सोमपुर, मढीयाहु जोनपुर राज्य उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पेल्हार पोलीस ठाण्याचे सपोनि/अर्जुन पवार हे करत आहेत.

सदरची कामगिरी श्री.मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री.दत्तात्रेय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सचिन कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्रीमती. डी.एन.चौधरी पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शकिल शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/रमेश वाघचौरे, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, मिथुन मोहिते, पो.अं./रवि वानखेडे, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अभिजित नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड नेम.पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.



-----------00000-------------